सो. स्थापनाः सन् 1928 सो. रजि. क्र.1308/1958-59

# बृहन्महाराष्ट्र मंडळ

(मध्यवर्ती संघटना, नवी दिल्ली)

दिलीप कुंभोजकर
प्रधान कार्यवाह

दिनांक 04/02/2022
मु. : जबलपूर

## वार्षिक सर्वसाधारण सभा, रविवार दिनांक 27 फेब्रुवारी 2022
## बैठक सूचना

प्रति,

**सन्माननीय सभासदगण ,**
**(संरक्षक /आजीवन /संस्थागत सभासद)**
**बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली**

**विषय : वार्षिक सर्व साधारण सभा सूचना व विषयसूची**

सर्व संरक्षक, आजीवन आणि संस्थागत सभासदांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे की बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्लीची वार्षिक सर्वसाधारण सभा, जी शनिवार, दिनांक 29 जानेवारी 2022, दुपारी 03:00 वाजता नियोजित होती, कोरोना महामारीमुळे उद्भवलेल्या सार्वजनिक आरोग्य परिस्थितीच्या कारणाने स्थानिक प्रशासनाच्या प्रतिबंधात्मक आदेश अनुपालन निमित्त आयोजित केली जाऊ शकली नव्हती, ज्याची सूचना आपणांस 11 जानेवारी रोजी देण्यात आली होती.

सध्याच्या सार्वजनिक आरोग्य परिस्थिती, कार्यक्रमासम्बंधात स्थानिक प्रशासनाचा सल्ला आणि मंडळाच्या घटनात्मक बाध्यता संबंधी आवश्यक्तांची पूर्ती या सर्व गोष्टींवर समग्रपणे विचार करून कार्यकारिणी द्वारे निहित अधिकारअंतर्गत सर्व पदाधिकाऱ्यांनकडून प्राप्त सल्ल्याप्रमाणे माननीय अध्यक्ष श्री मिलिंद महाजन यांनी फक्त घटनात्मक बाबीच्या पूर्तते साठी आवश्यक असलेले कार्य संपन्न करण्याच्या दृष्टीने एक दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. तरी या निर्णयाप्रमाणे आपणांस कळविण्यात येत आहे कि दिनांक 29 जानेवारी 2022 रोजी आयोजित न होऊ शकलेली वार्षिक सर्वसाधारण सभा, खाली विषयसूचीत नमूद केलेल्या विषयांवर चर्चा व निर्णय करण्या करिता आता पुनर्निर्धारित वेळापत्रकाप्रमाणे **रविवार, दिनांक 27 फेब्रुवारी 2022, सकाळी 10:00 वाजता, श्री माधव विद्यापीठ, 97/4 अहिल्या नगर , अन्नपूर्णा रोड (वैशाली नगर जवळ), इंदौर (म.प्र.) पिनकोड 452012** येथे आयोजित केली गेली आहे. ह्या बैठकीस आपली सर्वांची उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**सभेची विषयसूची**

1. पोर्ट ब्लेअर (अंदमान) येथे दिनांक 10/01/2020 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कार्यवृताचे वाचन व पुष्टी.
2. सांप्रत कार्यकारिणीचा पोर्ट ब्लेअर (अंदमान) अधिवेशन अर्थात 11 जानेवारी 2020 पासून आता पर्यंतच्या मंडळाच्या विभिन्न गतिविधींवर आणि वाटचाली वर प्रधान कार्यवाह च्या अहवालाचे वाचन व पुष्टी.
3. वर्ष 2021 मध्ये कोरोना परिस्थिती मुळे वार्षिक साधारण सभा आयोजित करता आली नाही तरी या कालावधीत कार्यकारिणी ने घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयांस कार्योत्तर स्वीकृती.
4. कोषाध्यक्ष द्वारे आर्थिक वर्ष 2019-2020 आणि आर्थिक वर्ष 2020-2021 चे अंकेक्षित आर्थिक विवरण (आय व्यय पत्रक व आर्थिक स्थिती विवरण ) प्रस्तुती व त्यास स्वीकृती.
5. वर्ष 2021-2022 च्या अंदाजपत्रकास कार्योत्तर स्वीकृती आणि 2022-2023 चे अंदाजपत्रक (बजेट) ची कोषाध्यक्ष द्वारे प्रस्तुती व त्यास स्वीकृती .
6. आर्थिक वर्ष 2020-2021साठी सनदी लेखापालच्या नियुक्तीस कार्योत्तर स्वीकृती आणि आर्थिक वर्ष 2021-2022 व 2022 - 2023 साठी सनदी लेखापालची नियुक्ती.

निरंतर .... 2

प्रधान कार्यवाह संपर्क : 'शाकंभरी', 19, सुधा विहार कॉलोनी, रामपूर, जबलपूर (म.प्र.) 482008,
मोबाईल : 9479639831, दूरध्वनी : 0761-2666253, ईमेल : dilipkumbhojkar@bmmindia.org.in
मंडळ संपर्क : 10056, मुलतानी ढान्डा, गल्ली नं. 2, पहाड़गंज, नवी दिल्ली - 110055

7. सभासदां कडून पूर्वप्राप्त प्रश्न व सूचना यावर उत्तरं.
8. अध्यक्षांच्या परवानगीने अन्य प्रस्तावावर चर्चा व निर्णय.

धन्यवाद

दिलीप कुंभोजकर
प्रधान कार्यवाह

**संलग्नः वरील प्रमाणे**

प्रधान कार्यवाह संपर्क : 'शाकंभरी', 19, सुधा विहार कॉलोनी, रामपूर, जबलपूर (म.प्र.) 482008,
मोबाईल : 9479639831, दूरध्वनी : 0761-2666253, ईमेल : dilipkumbhojkar@bmmindia.org.in
मंडळ संपर्क : 10056, मुलतानी ढान्ढा, गल्ली नं. 2, पहाड़गंज, नवी दिल्ली - 110055

**विशेष सूचना:**

1. समस्त सभासदांना सभास्थळावर शासकीय निर्देशानुरुप मास्क लावणे तसंच कोव्हीड सुरक्षित अंतर (social distancing) नियमाचे पालन करणे बाध्यकारी असेल.
2. सभासदांनी नोंद घ्यावी कि या सूचना दिनांक पश्चात इंदोर येथे नव्याने लागू कोरोना संबंधी निर्बंध आणि प्राप्त शासकीय अनुमतीच्या आधारावर बैठकीचा दिवस/वेळ आणि स्थान ह्यात परिवर्तन केले जाऊ शकेल ज्याची सूचना www.bmmindia.org.in इंटरनेट संकेत स्थळ वर अथवा अन्य माध्यमातून दिली जाईल व बैठक स्थळी सूचना फलकावर प्रदर्शित केली जाईल.
3. वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित होणाऱ्या सभासदांनी आपण याची आगाऊ सूचना कार्यवाह श्री दीपक कर्पे यांना त्यांचा मोबाईल क्रमांक 9425049554 वर मौखिक रित्या किंवा मंडळाच्या अधिकृत मोबाईल क्रमांक 8989792200 वर SMS किंवा व्हॉटसप माध्यमांतून द्यावी ही विनंती. कोव्हीड व्यवहार अनुरूप बैठक व्यवस्था करण्या साठी ही सूचना उपयोगी आहे. तरी सूचना देऊन उपस्थित राहणाऱ्या सभासदास बैठक स्थळी प्रवेश करण्यास प्राथमिकता दिली जाईल.
4. बैठकीच्या आधी समस्त दिवंगत सभासदांना श्रद्धांजली दिली जाईल
5. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने आयोजित केली जाईल. या साठी गणपूर्ती ची आवश्यकता राहणार नाही
6. मंडळाचे संरक्षक,आजीवन सदस्य तसेच संलग्न संस्थेचे दोन(2) अधिकृत प्रतिनिधी बैठकीस उपस्थित राहू शकतील. बेळगांव येथे संशोधित घटनेच्या विविध कलमांच्या अन्वये हितचिंतक श्रेणीत वर्ग केलेले सभासद बैठकीस उपस्थित राहू शकणार नाहीत तसेच संलग्न संस्थेचे प्रतिनिधी म्हणून देखील त्यांना मान्यता देण्यात येणार नाही (कृपया हितचिंतक सभासदांच्या संदर्भा करीता“वृहन माय मराठी” चा अंक किंवा मंडळाचे इंटरनेट संकेत स्थळ बघावे)
7. सभासदांना आर्थिक विवरण तसेच प्रस्तावित बजेट सबंधी कांही प्रश्न असतील ते लेखी स्वरुपात पोस्टाने अथवा ई मेल ने श्री जी के दातार ह्यांना दिनांक 22/02/2022 पर्यंत पाठवावे त्यांचा पत्ता व ई मेल एड्रेस बृहन माय मराठीच्या ह्या अंकात प्रकाशित केलेला आहे
8. मंडळाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच कार्य विषयी कांही प्रस्ताव अथवा सूचना असतील त्या श्री दिलीप कुंभोजकर प्रधान कार्यवाह ह्यांचा कडे दिनांक 22/02/2022 पर्यंत पाठवावे त्यांचा पत्ता व ई मेल एड्रेस पण बृहन माय मराठीच्या अंकात प्रकाशित केलेला आहे
9. वरीलक्रमांक 7 व 8 प्रमाणे प्राप्त झालेल्या लेखी प्रश्नांची उत्तरे प्रथमतःदिली जातील व तत्पश्चात अध्यक्षांची परवानगी असल्यास ऐनवेळी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली जातील. अनुपस्थित सदस्यांच्या लेखी प्रश्नाला विचारार्थ घेतले जाणार नाही
10. प्रत्येक सदस्याला त्याचा क्रमानुसार प्रश्न विचारण्याची संधी दिली जाईल व त्यावर निर्णय झाल्यावर अन्य प्रश्नकर्ता आमंत्रित केला जाईल ह्याची नोंद सर्वांनी घ्यावी . तसेच सदस्यांनी बृहन माय मराठी चा अंक बैठकीस येताना जरूर आणावा
11. संलग्न संस्थाच्या दोन (2) अधिकृत प्रतिनिधींना वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहता येईल त्या साठी बृहन माय मराठी च्या अंकात प्रकाशित अधिकृत प्रतिनिधी पत्र भरून संस्थेच्या अध्यक्ष,सचिव ह्यांचा सही व शिक्या सह आणावे लागेल. तसेच सर्व सदस्यांना मंडळाने जारी केलेले परिचय पत्र किंवा आधार कार्ड किंवा तत्सम अन्य कोणतेही सरकारमान्य फोटोयुक्त ओळखपत्र आणणे बंधनकारक राहील. या संबंधित अधिक माहिती करिता अधिकृत इंटरनेट संकेतस्थळ www.bmmindia.org.in यावर घटना आणि निवडणूक संहितेचा संदर्भ घ्यावा.

निरंतर ....4

सो. स्थापनाः सन् 1928 सो. रजि. क्र.1308/1958-59

बृहन्महाराष्ट्र मंडळ

(मध्यवर्ती संघटना, नवी दिल्ली)



12. सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी कि मतदान हेतू प्रतिनिधी नमित करणे आणि अधिवेशन साठी प्रतिनिधी नामित करणे हे दोन्ही वेगवेगळे विषय आहेत म्हणूनच दोन्ही अधिकारपत्रांचे प्रारूप वेगवेगळे असून ते वेगवेगळेच जमा करावे लागतील. सर्वसाधारण सभे करीताचे प्रारूप सुलभ संदर्भाखातर संलग्न आहे.
13. बैठक स्थळी प्रवेश करताना आपले ओळख पत्र दाखवून उपस्थिती रजिस्टर मध्ये हस्ताक्षर करणे सर्वांना बंधनकारक राहील .

दिलीप कुंभोजकर
प्रधान कार्यवाह

दिनांक: 04-02-2022

स्थळ : जबलपूर

बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली, वार्षिक सर्वसाधारण सभा

दिनांक 27 फेब्रुवारी 2022 - इंदूर (मध्यप्रदेश)

(संलग्न संस्थेचे अधिकृत प्रतिनिधी नोंदणी फॉर्म - 2 प्रतींमध्ये द्यावा)

| | | | |
|---|---|---|---|
| संलग्न संस्थेचे नांव | | | |
| संस्थेचा नोंदणी चे स्थळ, क्रमांक, व दिनांक | | | |
| बृहन्महाराष्ट्र मंडळाचा सभासद क्रमांक | IPM | संलग्नता दिनांक: | |
| संस्थेच्या संपर्क पदाधिकारीचे संपूर्ण नाव | | | |
| संस्थेचा संपूर्ण पत्ता | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शहर | | राज्य | | पिनकोड | |
| मोबाईल | | ईमेल आय. डी. | | | |

प्रिय आयोजक गण,

वर नमूद केल्या प्रमाणे आमची संस्था बृहन्महाराष्ट्र मंडळाशी संलग्न असून इंदोर येथे होत असलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेचे खाली दिलेल्या माहिती प्रमाणे प्रतिनिधी पाठवीत आहोत. कृपया ह्याची नोंद घ्यावी. आम्ही घोषणा करतो की वार्षिक सर्वसाधारण सभे संबंधी सर्व नियम आम्हाला मान्य आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रतिनिधी क्र. 1 | | | प्रतिनिधी क्र. 2 | | |
| नांव | | | नांव | | |
| आधार क्रमांक | | | आधार क्रमांक | | |
| संपूर्ण पत्ता | | | संपूर्ण पत्ता | | |
| शहर | राज्य | पिन | शहर | राज्य | पिन |
| मोबाईल क्रमांक | | | मोबाईल क्रमांक | | |
| हस्ताक्षर प्रतिनिधी क्र. 1 | | | हस्ताक्षर प्रतिनिधी क्र. 2 | | |

सही व शिक्का | सही व शिक्का

अध्यक्ष (संलग्न संस्था) | सचिव (संलग्न संस्था)

टीप: अधिकृत प्रतिनिधींनी फोटो असलेल सरकारमान्यओळखपत्र सोबत आणावे. संस्थेच्या लेटर हेडवर वरील प्रमाणे प्रतिनिधी पत्र आणावे.आवश्यक असल्यास प्रतिनिधी नोंदणी फॉर्म टाईप करून पाठवावा.